किंमत १० रुपये • पृष्ठे १०४ • जानेवारी २०१४ • वर्ष ७ वे • अंक ६६

# राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



'इंडिया'साठी नाही; आम्ही मत भारतासाठी मागतोय



महात्मा फुले : जागतिक दर्जाचे समाजशास्त्रज्ञ



'इंडिया'साठी नाही; आम्ही मत भारतासाठी मागतोय




संपादकीय

व्होट फॉर भारत

P-77 to 89 Nilesh




# कृषी संशोधनाला विरोध करणाऱ्यांना शेतकरी समुहाने लोकशाही मार्गाने सामुहिक शक्ती दाखवावी

## केंद्रीय कृषीमंत्री ना. शरद पवार यांची सूचना

**जळगाव येथील जैन इरिगेशन उद्योग समुहाच्या वतीने सूक्ष्म सिंचनाच्या क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या एका शेतकऱ्याला २ लाख रुपयांचा पुरस्कार पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या नावाने दिला जातो. यावर्षी हा पुरस्कार डॉ. अनिल जोशी यांना केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. त्या समारंभप्रसंगी श्री. पवार यांनी केलेले हे भाषण...**

आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती श्री एकनाथराव खडसे महाराष्ट्राचे विधानसभेचे विरोधी पक्ष नेते, राज्याच्या मंत्रीमंडळाचे मंत्री संजय सावकारे, संसदेतले माझे सहकारी श्री. ईश्वरलालजी जैन, हरिभाऊ जावळे, चिमणराव पाटील, हा सोहळा गेल्या १२ वर्षांत सहा वेळा आयोजित करण्याचा जे कणा बनलात ते भवरलाल जैन, ना. धों. महानोर, ज्यांचा या ठिकाणी आपण आज पुरस्कार देऊन गौरव केला ते डॉक्टर अनिल जोशी, सौ. जोशी, या ठिकाणी असलेले विधीमंडळाचे सभासद गुलाबराव देवकर, राजू देशमुख, जगदीशचंद्र वळवी, अरूणभाई गुजराथी, सतिश पाटील आणि माजी खासदार वसंतराव मोरे, आमचे जुने मित्र गुलाबराव पाटील फार दिवसातून दिसलेत आणि फार दिवसातून ऐकल नाही त्यामुळे जरा अस्वस्थ असतात. (हास्य) व्यासपीठावरचे सगळे मान्यवर, आणि उपस्थित सहकारी बंधु-भगिनींनो,




शरद पवार दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करताना. शेजारी डॉ. अनिल जोशी, एकनाथ खडसे, भवरलाल जैन, अरुण गुजराथी व संजय सावकारे

डॉक्टर आप्पासाहेब पवार यांच्या नावाने भवरलाल जैन यांनी हा पुरस्कार या ठिकाणी सुरू केला. शेतीच्या क्षेत्रामध्ये कोणी उत्तम काम करत असेल आणि विशेषतः प्रतिकुल परिस्थितीमध्ये काम करत असेल आणि यशस्वी होत असेल असे व्यक्तीमत्त्व समाजाच्या आणि शेतकऱ्यांच्या प्रेरणेने आणि अन्य शेतकऱ्यांनी त्याच्यापासूनची प्रेरणा घ्यावी या हेतूने गेले सहा वर्षात जे काही केल आणि ज्या परिसरामध्ये आपण जन्माला आलो इथल्या शेतीच्या संबंधीची अस्वस्थता स्थिती ही त्यांच्या मनामध्ये अस्वस्थता निर्माण करणारी होती आणि म्हणून वैद्यकिय व्यवसायातून बाजूला करून त्यांनी शेतीच्या क्षेत्रामध्ये लक्ष घातल आणि कोकणामध्ये जे करण शक्य आहे ते करण्याच्या संबंधीची जबाबदारी त्यांनी घेतली. त्यांनी सांगितल की महाराष्ट्रामध्ये सावंत राज्याचे कृषीमंत्री असताना फळबागांच्या संबंधीची भुमिका त्यांनी मांडली होती. त्याला न्याय द्यायचा मी बराचसा प्रयत्न केला. सुरूवातीच्या काही काळामध्ये त्याला यश आल. पण नंतर महाराष्ट्राचा संबंध फळबागांचा जर आढावा आपण घेतला की त्या वेळची जी योजना होती. त्या योजनेचा जास्तीत जास्त फायदा महाराष्ट्रामध्ये कोणत्या भागानी घेतला असेल तर तो कोकणवासीयांनी घेतला होता. दोन-अडीच लाख हेक्टरमध्ये काजू आणि हापूस आंब्याची लागवड करण्यासाठी तिथला शेतकरी फार यशस्वी झालेला आहे. कोकण म्हटल की एक काळ असा होता की वर्ष १६-१८ झाल की मुंबई आणि ६० वर्ष झाल्यानंतर कोकणात येत होते. सगळी तरुण पिढी ही बाहेर असायची. आचार्य अत्रेंनी एकदा गमतीमध्ये सांगितल मी लिहील होत पुर्वी ते अस म्हणायचे ही रत्नभुमी आहे तर अत्रेंनी सांगितल की रत्न बाहेर गेले आणि डोंगर शिल्लक राहिले. आज ती स्थिती नाही आहे. आज रत्नही कोकणामध्ये आहेत, कोकणाच्या बाहेर नाहीत. आणि जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये आपल कर्तृत्व दाखवता आहेत. शेतीच्या क्षेत्रामध्ये अनेक लोक फळबागाच्या क्षेत्रामध्ये उत्तम प्रकारची कामगिरी करता आहेत. आणि त्या मधल्याच गुहागर तालुक्यातले डॉ. जोशींची या ठिकाणी निवड झाली ती अत्यंत योग्य अशा प्रकारची निवड आहे. कारण कलम असोत, मसाल्याची पिक असोत, सुपारीची बाग असो, या सगळ्या क्षेत्रातून त्यांनी फार उत्तम काम केलेल आहे. एक नारळाच झाड लावायच आणि त्याच्यावर मसाल्याच पिक घ्यायच. एका झाडावर दोन पिक घ्यायची, ती कोकणातच आपल्याला पाहायला मिळतात. आणि पातळ सोडून जांभळा कलर सोडून त्याच्यामध्ये माती घालून हापूसच कलम लावायच आणि तो हापूस आंबा जगाच्या बाजारपेठेमध्ये पाठवायचा हे कर्तृत्व कोकणवासीयांनी आपल्या सगळ्यांना दाखवल आणि त्याच्यामध्ये उत्तम कामगिरी करण्याची भुमिका डॉ. जोशींनी केली म्हणून त्यांची निवड जी केली त्याबद्दल मी भवरलालजी आणि त्यांचा जो सगळा संच आहे त्यांच मनापासून अभिनंदन करतो. एका कर्तृत्ववान शेतकऱ्याची निवड या ठिकाणी केलेली आहे.

खर म्हटल्यानंतर शेतीचे प्रश्न खुप असतात. एकदा

यशवंतराव चव्हाणांनी सांगितलेली गोष्ट आहे. त्यांना कोणीतरी विचारल पार्लमेंटमध्ये की शेतीचे प्रश्न काय आहेत भारतात? त्यांनी सांगितल की पुर्वीच्या काळामध्ये मी वाचल आहे की रावणाला दहा तोंड होती. रावणाला जशी दहा तोंड होती तशी शेतकऱ्यांचे सुद्धा दहा तोंडासारखे दहा प्रश्न आहेत. एक प्रश्न सुटला की नवीन प्रश्न येतो, तो सुटला की आणखी काहीतरी अडचणी येतात. त्या सगळ्यांतून बाहेर पडल्यानंतर निसर्ग कोप होतो. निसर्ग पावला तर काहीतरी रोगराई येते. आता सांगितल एकनाथराव खडसेंनी की आता करपा आला. गेल्या दोन-तीन वर्षांच्या पुर्वी मी ज्या वेळेला आलो त्यावेळी हा प्रश्न मांडला होता इथे. आणि त्यावेळी करपासाठी आम्ही काही योजनाही केली ज्याचा उल्लेख एकनाथरावांनी केला. आज पुन्हाही सांगितल. दर वेळेला मी या कार्यक्रमाला येतो त्यावेळी एक नवीन समस्या

गेल्यावर्षी तांदुळाच्या निर्यातीमध्ये जगात भारताचा पहिला नंबर लागला. गेल्या वर्षी गव्हाच्या निर्यातीमध्ये भारताचा दुसरा नंबर लागला. साखरेच्या निर्यातीत दुसरा नंबर लागला. कापसाच्या निर्यातीमध्ये दुसरा नंबर लागला. हे घडू शकल आणि ते घडू शकल त्याच मुख्य कारण की काळ्या आईशी प्रामाणिक राहणाऱ्या शेतकऱ्यांनी घाम गाळला कष्ट केले आणि आपल कर्तृत्त्व दाखवल. त्यामुळे आज अन्नधान्यासाठी आम्ही कुठ भिक मागत नाही, कुणाच्या दारामध्ये जात नाही. आज आम्ही जगातल्या सतरा-अठरा देशांना त्यांच्या भुकेची समस्या सोडविण्यासाठी आम्ही मदत करतो, हे सगळ श्रेय या देशातल्या शेतकरी वर्गाच आहे. आणि त्यामुळे संधी मिळाली प्रश्न सोडवले तर शेतकरी काय करू शकतो हे या देशातल्या तुमच्यासारख्या कर्तृत्ववान लोकांनी दाखविलेल आहे.




एकनाथराव मांडत असतात आणि त्यातून आम्ही मार्ग काढण्याचा प्रयत्न करत असतो. कारण दर वेळी येण्याने समस्या वाढत असतील तर हा कार्यक्रम दरवर्षी घेण्याऐवजी दोन-चार वर्षातून घेत जा अस मला वाटत. यातला चेष्टेचा भाग सोडून द्या, पण प्रश्न खुप असतात शेतीत. पण एवढे प्रश्न असताना सुद्धा या देशातल्या शेतकऱ्यांनी संकटावर मात करून आपण काही वेगळ करू शकतो हे दाखविलेल आहे. ५-६ वर्षांच्या पुर्वी देशाचा अन्नमंत्री म्हणून मला संकट आल होत की परदेशातून गव्हाची आयात करण्याची. धान्य आम्ही आयात केली होती ती काही चूक झाली परंतु चित्र बदलल आम्ही आणि या देशातल्या शेतकऱ्यांनी आव्हान स्वीकारल आणि काय चित्र दिसल आपल्याला गेल्या वर्षी? जो देश हा धान्य आयात करत होता आज जगाचा दोन नंबरचा निर्यात करणारा देश म्हणून नाव गाजवतो आहे.

नुसती निर्यात केली, नुसती अन्नधान्याची निर्यात केली ती ३ लाख आणि ३२ हजार कोटी एवढ परकीय चलन या देशाला मिळाल आहे आणि शेतकऱ्यांनी मिळवून दिली. आतापर्यंत आपण नेहमी म्हणायचो वाचायचो की उद्योजक काम करतात. ठिक आहे उद्योजकांनी काम केल, त्यांनीही निर्यात केली. पण आता निर्यातीच्या वादळामध्ये माझा शेतकरी उतरला, या देशाच्या संपत्तीमध्ये तो भर करतो हे चित्र आज आपल्या सगळ्यांना बघायला मिळालेल आहे. हे चित्र वाढवायच असेल तर अनेक गोष्टी करण्याची गरज आहे. काही विकास प्रकल्प घेतलेत पण शंभर टक्के सगळेच यशस्वी होतील अस नाही आहे. एकनाथरावांनी काही प्रश्न मांडलेत त्या सगळ्या प्रश्नांचा विचार गांभीर्यानी सतत करावा लागेल.

मला एक गोष्ट सांगायला आनंद होतो की देशाच्या

पार्लमेंटमध्ये ज्यावेळेला या शेतीच्या प्रश्नांसाठी उभा राहतो तेव्हा देशाच पार्लमेंट आणि पार्लमेंटमधील सगळे सदस्य कुठलीही पक्षीय भुमिका घेत नाहीत. ते संबध देशाचा हा महत्त्वाचा प्रश्न म्हणून त्या प्रश्नाच्या पाठीशी देशाच्या शेतीमंत्र्याच्या पाठीशी उभे राहतात, सहकार्य करतात आणि त्यामुळे आम्ही निर्णय घेवू शकतो. साधी गोष्ट आहे ती एकच आहे हे पिक कर्ज अत्यंत महत्त्वाच आहे. एवढा मोठा देश किती पिक कर्ज मिळत होत या देशामध्ये गेल्या काही वर्षांच्या पुर्वी? ८६ हजार कोटी रुपयांच. अनेकांनी सातत्याने भुमिका मांडली. विरोधी पक्षाने साद त्याच्यामध्ये घातली. रिझर्व बँक असेल, अर्थमंत्रालय असेल की उद्योग क्षेत्राला काही लाख गोष्टीमध्ये सहन करणार त्यांच उत्पन्न मिळत. वेळ पडली तर व्याजाचा दर सुद्धा कमी केला जातो, पुनर्वसन केल जात. हे सुत्र या देशाच्या शेतकऱ्यांसाठी काही करायच नाही. आणि मला आनंद होतो गेल्या २-३ वर्षांपासून जिथे १२ टक्के व्याजाचा दर होता तिथे तो नंतर ८ टक्क्यावर आला. आणि नियमीत फेडणाऱ्यांसाठी ३ ते ४ टक्क्यांवर आला. आणि काही राज्यांमध्ये त्याच्यामध्ये स्वतः ची भर घातली आणि तो शुन्य टक्क्यावर सुद्धा आला हे या पुर्वी कधी झाल नाही. (टाळ्या) आणि सबंध देशामध्ये ८६ हजार कोटी रुपये जो व्यवसाय शेतीमध्ये होत होता तो गेल्या वर्षीचा आकडा हा ७ लाख कोटी रुपयांवर जाऊन पोहोचला आहे. एवढी रक्कम शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक करण्यासाठी पहिल्यांदा शेतकऱ्यांच्या कुटुंबामध्ये भरभराट झाली आणि त्याचे परिणाम आज जी आम्ही निर्यात करतो आहे याच्यासाठी दुसर काही त्याच्या पाठीमागच कारण नाही आहे.

ठीक आहे शेती मालाच्या किमती असतील, किमती द्याव्या लागतात, किमती हा मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. पार्लमेंटमध्ये याबद्दल वाद होत असतात. आज इथे आपण वाचतो काही लोकांनी देशामध्ये निवडणूकीमध्ये यश आल्यानंतर एक महत्त्वाची गोष्टी जाहीर केली. ती आमच्या हातामध्ये सत्ता आल्यानंतर कांदा असो, केळी असो, शेतीमाल असो त्या सगळ्यांच्या किमती आम्ही ५० टक्क्यांनी खाली आणण्याचा निकाल दिला. मोठी गंमत आहे. मला विचारल तुमच काम म्हणण आहे? म्हटल भाव कमी झाल्याचा आनंद आहे. महागाई थांबल्याचा आनंद आहे पण खताच्या किमती कमी झाल्या पाहिजे, विजेच्या दराच लफड कमी झाल पाहिजे, मजुरीच्या संबंधीचा प्रश्न कसा सोडवायचा या संबंधीचा मार्ग आम्हाला तुम्ही आम्हाला दाखविला पाहिजे. बाकीच्या सगळ्या शेतकऱ्यांना आपल कुटुंब चालवाव लागत, मुलाबाळांच्या शिक्षणासाठी खर्च




करावा लागतो त्या सगळ्यांच्या संबंधीची सुद्धा सुविधा काही वेगळ्या पद्धतीने केली पाहिजे. यातील एकाही व्यक्तीच अस म्हणण नाही की निर्णय घ्यायचा नाही आणि शेतकऱ्यांनी पिकवलेल्या मालाच्या किमतीच्या वर महागाई होऊ नये ही भुमिका मांडत बसू नये, ते कितपत न्यायाच आहे या संबंधीची आग्रही भुमिका मांडण्याच्या संबंधीची वेळ आलेली आहे.

मध्यंतरीच्या काळामध्ये महागाईचा प्रश्न देशाच्या टेलिव्हीजनवर आला तर कदाचित तुम्ही माझाही फोटो पाहिला असेल. महागाई म्हटल की माझा फोटो दाखवायचे. (हास्य) ती गमतीची गोष्ट आहे. कांद्याच्या किमती वाढल्या शरद पवार, टमाट्याच्या किमती वाढल्या शरद पवार, बाकीच्या या सगळ्या शेतमालाच्या किमती वाढल्या की महागाईला जबाबदार हा. आज कांद्याच्या किमती

पडल्या कोणी विचारत आहे ढुंकून त्याच्यामध्ये. आज त्याच्यामध्ये कोणी विचार करायला तयार नाही. आज त्या नासिकच्या मळ्याचा शेतकरी आपला कांदा दिल्लीमध्ये पाठवायच म्हटल्यानंतर त्याच वाहतुकीच जे बिल येत ते दिल्याच्या नंतर जी विक्रीची पर्ची येते त्याच्यात वाहतुकीच बिल मी मागितल आहे आणि त्यावेळेला हताश होऊन ज्या वेळेला भेटतो त्यावेळेला या देशातला मिडीया त्या शेतकऱ्यांच्या दुखण्याच्या संबंधी कधी विचार करीत नाही. (टाळ्या) कधीतरी एकदा त्या ठिकाणी भाव वाढायचा, ५० रुपये, ६० रुपये, ८० रुपये हा भाव काही नित्याचा




भाव नसतो. एखाद्या वेळेला काहीतरी हे घडल तर त्याची सबंध देशामध्ये चर्चा होत असते. आमच्या लोकसभेमध्ये आणि राज्यसभेमध्ये सुद्धा या प्रश्नासाठी अधिक चर्चेसाठी वेळ उपलब्ध होतो पण तो सोडवायला तयार होत नाही. शेतकरी ज्यावेळी उध्वस्त होतो त्यावेळी त्याच्यासंबंधीचा विचार करण्यासाठी त्यांना फारसा रस वाटत नाही. आणि म्हणुन एक मानसिकता बदलण्याची गरज आहे. आणि ती मानसिकता मी काहीतरी सामान्य माणसाला मध्यमवर्गीयांना यातना व्हावी अशाप्रकारची भाववाढ व्हावी याची मी कधी मागणी करणार नाही, त्याचा मी पुरस्कारही करणार नाही. परंतु उत्पादन खर्चाचा विचार करून प्रपंच चालविण्यासाठी ज्याची आवश्यकता आहे कमीतकमी तेवढतरी पदरात पाडायचा अधिकार या देशाच्या शेतकऱ्यांचा आहे ही भुमिका मांडून त्या संबंधीचा आग्रह धरण्याच्या बद्दलची भुमिका. (टाळ्या)

बर आम्ही हे पाहतो ज्यावेळी चर्चा होते त्यावेळी सगळे गप्प बसतात, भाव मिळतात त्यावेळेला आनंद असतो पण भाव पडल्यानंतर आम्ही सगळे जण जागे होतो. माझी विनंती ही आहे की इथुन विचार करावा लागेल शास्त्रशुद्धरीतीनं शेतीच्या अर्थशास्त्रासंबंधीचा विचार हा आपण सगळ्यांनी करण्याबद्दलची गरज आहे. आपण जास्त मागायचा नाही, पण योग्य असेल ते मागायच. योग्य असेल तर ते मागण्यासाठी इतर राजकिय वैर न ठेवता एका विचारानी या देशातल्या बहुसंख्य लोकांचा उद्योगाचा प्रश्न सोडविण्यासाठी आपल्याला हा वर्ग टिकला पाहिजे जगला पाहिजे त्याच्यामध्येही काम झाल पाहिजे हा दृष्टीकोन ठेऊन आपण एकत्र राहू शकलो तर माझी खात्री आहे की एकप्रकारच वेगळ चित्र आपल्या देशामध्ये निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

आज ५२ टक्के, ५६ टक्के, जवळपास ६० टक्क्यांच्यावर लोक शेतीच्या क्षेत्रामध्ये आहेत. आणि शेती परवडणारी झालेली आहे. ८२ टक्के लोकांच्यामध्ये २ हेक्टरच्या आत जमीन आहे. आणि त्यांच्यापैकी ६० टक्के शेतकरी असे आहेत की ते जिरायत शेतकरी आहेत त्यांच्या शेतीला खात्रीच पाणी नाही. २ हेक्टरच्या आत जमीन आहे पाण्याची खात्री नाही. त्यावर पाच जणांचा प्रपंच चालवावा ही काय साधी गोष्ट आहे? हे शक्य नाही. आणि म्हणून आता वेळ अशी आलेली आहे की आपण शेतीच्या क्षेत्रामध्ये भांडवली गुंतवणूक कशी अधिक करता येईल यासाठी सगळ्यांनी आग्रही भुमिका घेतली पाहिजे, जागृकता ठेवली पाहिजे, आणि मग थेंब आणि थेंब पाण्याचा वापर कसा करता येईल या दृष्टीकोनातून पावल टाकले पाहिजे.


सगळीकडेच काही गोष्टी धरण बांधण शक्य आहे अस नाही पण जिथे शक्य असेल त्या ठिकाणी पाणी थांबवल पाहिजे. आणि ते पाणी देताना सबंध क्षेत्राला पाणी देण्याच्या ऐवजी, त्या मुळांना पाणी देण्याच्या बद्दलची, रोपांना पाणी देण्याच्या बद्दलची ही जर खबरदारी आपण जर घेऊ शकलो ठिबक सारख्या पद्धतीनं तर या देशाच शेतीच उत्पादनही

वाढेल आणि मर्यादित पाण्यामध्ये आपण चमत्कार करू शकतो हे चित्र सुद्धा आपण जगामध्ये दाखवू शकू आणि त्या दृष्टीकोनातून आपल्याला पावल टाकावी लागली. म्हणून तंत्रज्ञान याचा प्रसार झाला पाहिजे. विज्ञानाचा आधार घेता आला पाहिजे. आणि विज्ञानाचा आधार घेऊन आम्ही जर काही करायला गेलो तर ते करण्याच्या बद्दलची पाऊल टाकली पाहिजे.

आज सकाळी मी महिको कंपनीला पन्नास वर्ष झाली म्हणून जालन्याला त्या सोहळ्यासाठी गेलो होतो. त्यांनी नवीन काही काम केलीत, संशोधन केल. बीटी सारखा कापूस तयार केला. आज हा चार्ट त्यांनी पाठवला बीटी कॉटन. सबंध भारतातल कापसाच उत्पन्न दुप्पट वाढल, क्षेत्र वाढल नाही फारस. आहे याच्यातच बीटी कॉटनमुळे उत्पन्न वाढल आणि ९३ टक्के शेतकरी कापूस उत्पादक आज बीटी कापूस घेतात. आणि याचा अर्थ त्याच्यापासून शेतकऱ्याला लाभ होतो म्हणूनच या प्रकारच पिक आज शेतकरी घ्यायला पुढे आले आहेत. जो भारत सहा वर्षांच्या पुर्वी कापुस आयात करत होता तो भारत आज कापूस निर्यात करतो याच्यामध्ये मुख्य कारण बियाण्याच्या साथीवर झालेले संशोधन मध्यंतरी माझ्या वाचनामध्ये आल की देशामध्ये



पन्नास शास्त्रज्ञ असे निघाले की ज्यांनी प्रधानमंत्र्यांना पत्र लिहील की शेतीच्या बियाण्यांच्या संदर्भात हा जो नवीन बदल करण्यासंबंधीचा प्रयत्न केला जातो आहे त्याला आमचा सक्त विरोध आहे की हे काम थांबविल पाहिजे. आणखी काही लोक त्याच्याही पुढे गेले आहेत, मध्यंतरी सुप्रिम कोर्टामध्ये केस झाली. भारत सरकारच्या कृषीमंत्रालयावर की तुम्ही शेतीमध्ये संशोधन करून नवीन जाती तयार करतात, बीटी कॉटन सारख बायोटेक्नॉलॉजीची मदत घेऊन, याच्यामुळे फार विशेष परिणाम होणार आहे आणि म्हणून संशोधन करण्यासाठी आणि संशोधन केलेल्या नवीन शेतीमालाच्या वाणाच्या ट्रायल घ्यायला दहा वर्ष या देशात बंदी करावी. मला काही समजूच शकत नाही. संशोधकांनी संशोधन केल की शेतकऱ्याच्या हिताच आहे का नाही हे शिवारात लावल्याशिवाय, आणि त्याचा परिणाम उत्पन्नावर होतो आहे का नाही, काही विपरीत होतो आहे का, मातीवर होतो आहे का, इतर पिकावर होतो आहे का, धरणावर होतो आहे का, माणसाच्या शरीरसंपत्तीवर होतो आहे का, या सगळ्या गोष्टीची टेस्ट चाचपणी ही केली पाहिजे आणि त्याच्यासाठी त्याच्या ट्रायल घेण्याबद्दलची गरज आहे. पण सांगितल गेल की ट्रायल बंद करून टाका!



सुदैवानं आम्ही फारच भांडण केल सुप्रिम कोर्टामध्ये त्यामुळ सध्या त्याच्यावरचा स्टे काढलेला आहे, अंतिम निर्णय अजुन व्हायचा आहे. पण ही मागणी केली जाते, तज्ञांच्याकडून केली जाते, मिडीयातून केली जाते. नवीन संशोधन करण आणि अधिक उत्पादन वाढण याला काही पर्याय नाही या देशामध्ये. ज्या देशाची लोकसंख्या शंभर कोटीहून अधिक आहे, जमीन काही वाढणार नाही, पाणी काही वाढणार नाही, आज सबंध भारताच चित्र पाहिल आहे, सगळ्या जगाशी तुलना केली तर जगाच्या अडीच टक्के जमीन आमच्याकडे आहे, जगाच्या चार टक्के पाणी आमच्या देशामध्ये आहे आणि जगातल्या सतरा टक्के लोकांना दोन वेळच अन्न द्यायची जबाबदारी एवढ्या मर्यादीत साधनामध्ये आहे. आणि म्हणून पाणी आणि जमीन कमी असताना एवढ्या मोठ्या लोकसंख्येला आणि त्यातून जगातल्या अन्य देशातल्या लोकसंख्येला सुद्धा अन्न सुरक्षेचा प्रश्न सोडवायचा असेल तर उत्पादकता वाढविल्याशिवाय गत्यंतर नाही. उत्पादकता वाढवायची असेल तर नवीन वाण हे शेतकऱ्यांच्या पर्यंत गेले पाहिजे, याच्यात संशोधन झाल पाहिजे. त्या संशोधनामध्ये काम करणारे जे शास्त्रज्ञ असतील त्यांना प्रोत्साहित केल पाहिजे त्याशिवाय पर्याय नाही. आज त्याला विरोध होतो आहे.

माझी विनंती आहे की शेतकरी सगळ्या समुहानं अशा संशोधनाला विरोध करणाऱ्या लोकांच्या बाबतीत आपली सामुहिक शक्ती लोकशाहीच्या मार्गाने आपण दाखवली पाहिजे. नाहीतर हे संशोधन संपल, नवीन वाण संपेल, आणि पुरातन बियाण आम्ही जायच म्हटल्याच्या नंतर ही सबंध शेती ही उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही आणि शेतकरी उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही.

मला जैन इरिगेशनच कौतुक एका गोष्टीच वाटत जी काही इरिगेशनची साधनं ते विकतात पण त्या साधनांच्या बरोबर उत्पादकता वाढविण्यासाठी जी काही खबरदारी घेतली पाहिजे त्याच्यासाठीही फार मोठ काम करतात, त्याच्यासाठी भांडवली गुंतवणूक करतात. आज टिश्यूकल्चरच्या माध्यमातून रोप तयार करण, आणि ते शिवारात नेऊन लावण आणि त्याच्यातून उत्पादन वाढण, रोगप्रतिबंधक अशा प्रकारची रोप लावण, याचा किती उपयोग आहे. अनेक वेळेला आपण बघतो की फळबागा लावा म्हणून आम्ही सांगतो आणि फळबागा लावल्यावर चांगले जर रोप मिळाले नाहीत तर काय होईल?

माझ्या स्वतःच्या शेतामध्ये डाळिंबाची लागवड केली आणि पाचव्या वर्षी तेल्या रोगानं सगळी बाग खराब झाली. सांगण अवघड लोकांना, तुम्ही बघा देशाच्या सगळ्या शेतकऱ्यांना उद्देश आणि त्याची बाग ही तेल्या रोगाने गेली आणि म्हणून सांगितल नाही कुठ खास. पाच वर्षाच्या पुर्वी मी पेरु लावायचा निकाल घेतला. कानपुरच्या भागामध्ये रोप तिथल्या काही लोकांनी सांगितल की आमच्याकडच बेण हे अतिशय चांगल आहे, आणि म्हणून लखनौवरून शेवंती पन्हेरी पेरुची आणली, दोन-अडीच एकरामध्ये पेरु लावला. चौथ्या वर्षी बघितल साठ टक्के झाडांना पेरूच नाही. का? तर रोप चांगली मिळाली नाहीत. आता देशाच्या शेतीमंत्र्याची ही अवस्था तर साम




गांधीतीर्थाची शरद पवार पाहणी करताना शेजारी भवरलाल जैन व संजय सावकारे.



टिश्यूकल्चरची रोपे व माती भरणाऱ्या नवीन यंत्राची शरद पवार पाहणी करताना. शेजारी अजित जैन यासंबंधी त्यांना माहिती देताना.

न्य शेतकऱ्याची अवस्था काय असेल? आणि म्हणून रोप ही चांगलीच मिळाली पाहिजेत, योग्यच असतील पाहिजेत, त्यातून उत्पादन मिळालच पाहिजे. आज त्या ठिकाणी एखाद फळबागाच पिक घेतल्याच्या नंतर पाच वर्ष त्याची खबरदारी घ्यायची आणि पाच वर्षांनी त्याला कळायच हे काही योग्य नाही. त्याच्या पाच वर्षामध्ये त्याची गुंतवणूक होते त्याच्या आयुष्याच जी काही कमाई त्याला जो धक्का बसतो ही काही साधीसुधी गोष्ट नाही. आणि म्हणून जैन इरिगेशन या ठिकाणी टिश्यूकल्चरच्या माध्यमातून या ठिकाणी रोप तयार करण्यासंबंधीची कामं घेतात याच्यामध्ये रोगराईपासून शंभर टक्के मुक्तता आणि खात्रीच रोप की ज्या ठिकाणी पिक येईल आपण योग्य काळजी घेतली तर, यासाठी इथे चाललेले प्रयत्न हे एका दृष्टीनं फळबागाच्या क्षेत्रामध्ये जाणाऱ्या शेतकऱ्याला वरदान आहे आणि म्हणून माझ्या सारख्याला याच्यामध्ये सहभाग घ्यायचा मला मनापासूनचा आनंद होतो आहे आणि म्हणून भवरलालजी तुम्ही हे काम हातामध्ये घेतल आहे हे करा, दोन पैसे मिळवता आहे मिळवा. आमची काही हरकत नाही. या ठिकाणी सगळे काम करतात ते काही मिळवण्यासाठी काही मिळवत नाही? अच्छा अच्छा मला वाटल मिळवत नाही म्हणजे उद्या पासून किंमत कमी झाली असली तर सांगून टाकावी म्हणजे आम्ही लवकर कार्यक्रम घेऊ. असो. पण सांगायच हे की या सगळ्या प्रयत्नातून, या आधुनिकेतून सबंध शेतीच अर्थकारण हे बदलायला मदत होते. आणि मघाशी सांगितल एकनाथरावांनी की ही गोष्ट खरी आहे की हे काम जळगावमधून होत आहे ते जळगावच काम जळगावपुरत सिमीत राहिलेल नाही ते महाराष्ट्राच्या सगळ्या जिल्ह्यामध्ये पोहोचल, देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये पोहोचल आणि जगाच्या सोळा-सतरा देशांमध्ये आज पोहोचल याचा अभिमाना एक भारतीय म्हणून तुम्हा-आम्हाला सगळ्यांना आहे आणि म्हणून हे काम तुम्ही करत रहा.

शेतकऱ्याच्या जीवनामध्ये बदल होण्यासाठी जे काही तुम्ही आणि तुमचे शास्त्रज्ञ कष्ट करतात ते अखंडपणाने तुम्ही प्रयत्न करा. आयुष्यामध्ये दोन पैसे मिळवले त्याच समाधान असेल त्या पेक्षा त्या शेतकऱ्याच घर बदलल हे जे पाहायला तुम्हाला मिळेल त्याच समाधान मिळेल त्याच्याइतक दुसर कुठल समाधान नाही आणि त्या समाधानाला आपण पात्र आहात याबद्दल मनापासूनचा आनंद या ठिकाणी व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवतो.



# आप्पासाहेब आणि आण्णासाहेबांचे अपूर्ण स्वप्न मी पूर्ण करतोय : भवरललाल जैन यांचे भावपूर्ण उद्गार

सर्वप्रथम आप्पासाहेबांच्या स्मृतीला अभिवादन करतो. आप्पासाहेब पवार, आण्णासाहेब शिंदे ही त्या पिढीची माणस होती ज्यांनी शेतीबद्दल आणि शेतकऱ्यांबद्दल खुप मोठमोठाल्ली स्वप्न पाहिली. पंचवीस वर्षांपुर्वी ठिबकसाठी त्यांनी अगदी जीव तोडून सगळ्या ठिकाणी निस्पृहपणे उपदेश दिला त्याची प्रात्याक्षिक उभी केली. आणि त्यांची जी काही राहिलेली स्वप्न होती ती भवरलालजी तुम्ही पुर्ण करा असा भावपुर्ण आदेश मला दिला. त्या पंचवीस वर्षांपुर्वी आधी आपण ठिबक सिंचनाच्या मार्फत त्याची सुरुवात केली आंणि सर्वसाधारण शेतकऱ्याला सधन करण्यासाठी, कमी पाण्यात जास्त उत्पन्नासाठी हे टिश्यूकल्चरच शास्त्रतंत्रज्ञान आपल्याला आजच्या पुढे उपलब्ध करून देणार आहोत त्याचा हा सोहळा आहे.

डॉ. जोशी यांची स्वतःची पन्नास एकर जमीन असूनही एक छोटा तुकडा पडेल एवढी सुद्धा जमीन सपाट नाही अशी डोंगराळ जमीन कोकणातली आहे. अमेरिकेत 'ॲव्हकडो' नावाच एक फळ असत ते डॉक्टरांच्या शेतामधून तिथे पोहोचत. डॉक्टर राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आहेत, पण गैरसमज करून घेऊ नका त्याच्यामुळे त्यांच काही सिलेक्शन झालेल नाही. म्हणजे राष्ट्रवादीचा कार्यकर्ता असला पाहिजे किंवा जैन इरिगेशनचा माल त्यानी घेतलेला असला पाहिजे असली कोणतीही अट या पुरस्कारामध्ये लावली जात नाही. आणि याच्याबद्दल आपण अगदी निःशंकपणे आपली जी काही नाव असतील ती जरूर सुचवा, आम्ही तिथे जाऊ आणि तिथे गेल्यानंतर किंवा आम्ही जातच नाही, आपले कोकण विद्यापीठाचे माजी कुलगुरु मगरसाहेब असतात. आणि आपली जी तिथली युनिव्हर्सीटी आहे कोकण विद्यापीठ त्याचे हल्दीकर नावाचे एचओडी आहेत होर्टीकल्चरचे ते होते आणि त्यांच्याबरोबर एक आमचा ॲग्रॅनॉमीस्ट होता. अशा तीन जणांची टीम कोकणाला जवळजवळ दहा दिवस फिरत होती. त्याच्यानंतर त्यांनी बावीस नावांच सिलेक्शन केल, त्या बावीस नावांपैकी शेवटच एक नाव जे सिलेक्ट झाल या पारितोषिकासाठी ते जोशीसाहेब आहेत. हे लहानस माझ प्रास्ताविक आहे. साहेबांना जास्त वेळ मिळावा म्हणून मी जास्त आज बोलणार नाही आणि आभाराचा कार्यक्रम सुद्धा मी प्रास्ताविकातच निपटून घेत आहे त्याच्याबद्दल तुमची क्षमा मागतो आणि आता या पुरस्काराच जे स्वरूप आहे त्याच्यामध्ये आतापर्यंत एक लाख रुपये आणि इतर सगळे मानचिन्ह वगैरे देत असू, या वर्षापासून त्याची एका लाखाऐवजी दोन लाख रुपये आपण शेतकऱ्याला देणार आहोत एवढी आज मला ही घोषणा करायची होती.

मागे चार वर्षांमध्ये, म्हणजे मागे दहा वर्षांमध्ये या चार शेतकऱ्यांना हा पुरस्कार प्राप्त झाला ते चारही शेतकरी पुरस्कर्ते इथे हजर आहेत हे मला आवर्जून सांगावस वाटत.

# आप्पासाहेब पवार हे कृषी क्षेत्राचे ऋषी व आमचे दैवत

## डॉ. अनिल जोशी यांचे गौरवोद्गार

कोकणातील एका शेतकऱ्याच कौतुक करायला उपस्थित असलेल्या माझ्या शेतकरी बंधुंना, बंधु आणि भगिनींनो, या वर्षीचा डॉक्टर आप्पासाहेब पवार कृषी उच्चतंत्रज्ञान पुरस्कार नामदार पवारजींच्या हस्ते माननियांच्या आशीर्वादाने व आपणा सर्वांच्या उपस्थितीत मला मिळत आहे, हा माझा आयुष्यातील अत्यंत भाग्याचा दिवस आहे.

मी कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात असलेल्या नरवण या गुहागर तालुक्यातील अत्यंत दुर्गम व एका टोकाच्या गावात असलेल्या गावात गेली पस्तीस वर्ष वैद्यकिय व्यवसाय करतो आहे. या व्यवसायात आसपास पंधरा-लावून खडक फोडल्याशिवाय तिथे गवताचे पातेही उगत नाही. अशाप्रकारची एक अत्यंत गंभीर परिस्थिती आहे. पण परिसरातील शेकडो कुटुंबांना आपण प्रयोग करून आधुनिक सुविधा वापरून शेती आणि बागायतीतून चरितार्थ चालू शकतो हे दाखवून द्यावे हाच ध्यास घेऊन दिवसरात्र रुग्णांची सेवा करीत असतानाच आम्ही भूमातेची सेवा करायचे ठरवले आणि विविध प्रकारची बागायत सुरू केली. मिळेल त्या मार्गेने पाणी आणले. नारळ आणि सुपारीच्या बागा फुलवल्या. कृषी विद्यापीठाच्या मार्गदर्शनाने जायफळ, मीरी, दालचीनी, या सारख्या मसाल्याच्या पिकांचे उत्पादन घेण्यास सुरुवात केली. खडक फोडून व डोंगर उतारावर आंब्याच्या




वीस गावातील गरीब रुग्ण तपासताना त्यांची हालाखीची परिस्थिती बघून वैद्यकिय सेवे व्यतिरीक्त अन्य मार्गाने या गरीबांची सेवा करावी हा निर्णय माझ्या मनाने घेतला आणि मी आणि माझी पत्नी दिपा या दोघांनी बागायती शेतीचे काम सुरू केले. सुरुवातीला माझे आईवडील व माझ्या मोठ्या बंधुची मदत झाली. ज्या नरवण व तवसाळ भागात शेती बागायत करतो तो भाग अत्यंत खडकाळ आहे. सुरूंग बागा उभ्या केल्या. त्याच पाण्यावर एकाच खतावर गुलाबाची लागवड केली. काही प्रमाणात भाजीपालाही केला. आणि वैद्यकिय व्यवसायाबरोबरच एक चांगला शेतकरी म्हणूनही आत्मविश्वासाने उभा राहिलो. हे करीत असतानाच परिसरातील शेकडो कुटुंबांना आम्ही रोजगार दिलाच पण स्वतःच्या फळबागा उभ्या करून त्यांना स्वावलंबी व्हाव यासाठी सर्व प्रकारची मदत या सर्वांना केली. आणि या



श्री. शरद पवार हे डॉ. अनिल जोशी यांचा शाल घालून सत्कार करताना समवेत सौ. दीपा जोशी

ऐतिहासीक कामगिरीला अभिवादन करूनच आपल्या कामाची सुरुवात करतात. कृषी आणि ऋषी ही भारताची चिरंतन परंपरा आहे. आप्पासाहेब हे या क्षेत्राचे ऋषी होते म्हणून त्यांच्या नावाचा पुरस्कार स्वीकारताना माझ्या मनात ज्या कृतज्ञतेच्या भावना निर्माण झाल्या आहेत त्या आणखी काही दशके कोकणातील शेती बागायत समृद्ध करण्याकरीता, अखंडपणे काम करण्याकरीता मला प्रोत्साहन देत राहतील.

सर्वांनी माझ्या प्रयत्नांना उत्तम प्रतिसाद दिला म्हणून आजचा माझा होणार सन्मान हा केवळ माझा नाही तर शेती बागायतीमुळे स्वावलंबी झालेल्या माझ्या गावातील परिसरातील शेकडो कष्टकरी शेतकरी कुटुंबाचे आहे. म्हणून त्या सर्वांच्या वतीनं मी कृतज्ञता व्यक्त करतो.

माझा मुलगा डॉक्टर शंतनू हा वैद्यकिय व्यवसायात माझ्या क्षेत्रात माझ्या मदतीसाठी पुढे आला त्यामुळे शेती बागायतीत मी अधिक लक्ष आणि वेळ देवू शकलो. माझी पत्नी दिपा हीने मला अथकः साथ दिली. आता सून शर्वरी कौटुंबिक जबाबदारी सांभाळते. धाकटा मुलगा विक्रम हा स्वतः इंजीनिअर आहे पण तोही आमच्याबरोबर शेती-बागेत रमला आहे. त्याची आधुनिक दृष्टी व तंत्रज्ञान आमच्या शेती बागायतेतील आणि पंचक्रोशीतील शेती बागायतीत रमलेल्या कष्टकरी कुटुंबानाही भुरळी पडते.

ज्यांच्या नावाने मला हा पुरस्कार दिला जातो आहे ते कै. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब पवार हे आमच्या क्षेत्रातील आमच दैवत आहे. त्यांनी कृषी क्षेत्रात प्रचंड काम केल आणि संपुर्ण महाराष्ट्रात या क्षेत्राला नाविन्यपूर्ण ओळख करून देत असताना चैतन्य निर्माण केल. आज महाराष्ट्रात कृषी क्षेत्रात कृषी तंत्रज्ञानात जे जे संशोधनात काम करतात ते सर्व जण पद्मश्री आप्पासाहेबांच्या

शेती पाण्याकरीता आप्पा- साहेबांच्या प्रेरणेने येथील, आप्पा- साहेबांनी भवरलालजींना इस्राईलला पाठवले, इस्राईलला घेऊन गेले. तेथील त्यांनी शेतकरी पाहिले, शेती पाहिली. नवे तंत्रज्ञान आत्मसात केल आणि इथे येऊन ही कारखानदारी उभी केली. आप्पासाहेबांसारखे मार्गदर्शक, जैन समुहासारखा झपाटलेला कृषी तंत्र समुह आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन थोडफार काम करणारे आमच्यासारखी खेडेगावातील शेतकरी मंडळी असा सुंदर संगम आज महाराष्ट्राच्या पावनभुमीत झालेला दिसतो.

कोकणातील शेती बागायत म्हटले की स्मरण होते ते डॉ. बाळासाहेब सावंत यांचे. ६५ वर्षांपुर्वी कोकणातील

सौ. दीपा जोशी यांचा साडीचोळी देऊन सत्कार करताना सौ. ज्योती भाभी जैन.



बागायतीवर त्यांनी सावंत समितीचा अहवाल ज्यावेळी मुंबई सरकार, त्यावेळी मुंबई सरकार होत त्यांना सादर केला. काजु, सुपारी, मासळी, दुध हे कोकणच्या समृद्धीला हा प्रगतीचा महामार्ग आहे महामंत्र आहे अस त्यांनी त्याच वेळी सरकारच्या लक्षात आणून दिल होत. कृषीमंत्री असताना त्यांनी पुढाकार घेतला आणि कोकणासाठी स्वतंत्र कृषी विद्यापीठ निर्माण केल.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, केंद्रसरकारमध्ये कृषीमंत्री असताना नामदार शरदरावजी पवार साहेबांनी कृषी विद्यापीठाला ताकद दिलीच पण कोकणातील मत्स्यउद्योगासह फलोद्यान विकासासाठी आणि प्रक्रिया उद्योगासाठी अनेक योजना राबविल्या. कोकणातच नव्हे तर महाराष्ट्रात रोजगार हमी योजना आणून फलोद्यान ही क्रांतीकारी योजना त्यांनी आणली. या सर्वांच्या दुरदृष्टीतून आज कोकण उभारत आहे. माननीय डॉ. भवरलालजी जैनने जैन उद्योग समुहाचे दुरदृष्टी असलेले संस्थापक व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी, संपुर्ण महाराष्ट्र फुलविण्यासाठी फार मोठ काम केल आहे. अर्थात त्यांनी कोकणात अधिक आपुलकीने लक्ष घालावे. कोकणात १५० इंच पाऊस पडतो हजारो क्यूसेक्स पाणी समुद्राला मिळते.



गांधीतीर्थची शरद पवार यांनी पाहणी केली तेव्हां समवेत भवरलाल जैन, अनिल जैन, संजय सावकारे व अन्य

बाळासाहेब सावंत कोकणजीवी वर्कर्स आहेत अस म्हणायचे. अस सांगताना ते अगदी वरवरही या भूमीत रस आहे अस सांगत असत आणि त्याचा अनुभव आम्ही घेत आहोत. मात्र ड्रीप इरिगेशनची ही उशिरा केलेली सुरुवात याच मला अजूनही दुःख होत आहे. जगामध्ये बाहेरून आलेल्या स्मृतींची बारा ठिकाण आहेत त्यामध्ये पश्चिम गटातील कोकणचा समावेश आहे. निसर्गाने इथे भरपूर दिल आहे. शासनाच्या चांगल्या योजनाही आहेत. आता कोकणातील कष्टकऱ्यांना बागायतीच महत्त्व पटू लागल आहे. याच वेळी कोकणातील जलदेवता व फलोद्यानासाठी अत्यंत पोषक असलेली आमची कोकणची भूमाता यांना एकत्र आणण्याच काम जैन उद्योग समुहाने केल आहे. तर शिव छत्रपतींची राजधानी असलेले स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी देशभक्तांची जन्मभुमी असलेले निसर्गानी नटलेले महाराष्ट्राची देवभुमी म्हणून ओळखले जाणारे कोकण भारतातील सर्वात समृद्ध भूमी म्हणून ठरू शकेल.

आपण एका लोकत्तर कृषी महर्षींच्या भागातील एका दुर्गम भागात काम करणाऱ्या शेतकऱ्याचा पुरस्कार देऊन कोकणासाठी एक चांगला संकेत दिला आहे. आता हेच नात आपण घट्ट करू या. आणि सुजलाम असलेली कोकणभुमी सुफलाम करण्यासाठी कटीबद्ध होऊ या अशी नम्र प्रार्थना करतो व आपणा सर्वांना अभिनंदन करून आमच्या जीवनात हे एक नवे पर्व सुरू झाल आहे याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून माझे मनोगत संपवतो.

Post Regn. No. : MH/MR/South-283/2014-16
Published on 15th of every month posted on 15th, 16th & 17th of every month at Mumbai Patrika Channel Sorting Office Mumbai 400001. RNI No. : MAHMAR / 2008 / 39849



# जैन टिश्युकल्चर डाळींब रोपांचे बुकींग सुरू

- डाळींब उत्पादकाच्यांच्या उदंड प्रतिसादाने चालु वर्षामध्ये मोठ्या प्रमाणात डाळींब रोपांची निर्मीती करीत आहोत.
- गेल्या सात वर्षापासून जैन इरिगेशन डाळींब टिश्युकल्वर रोपांची निर्मीती करीत आहे.
- डाळींब टिश्यु रोपांची वाढ जोमदार, भरगच्च बहार व उत्तम फळांचे सेटींग सशक्त वाढीमुळे अनेक शेतक-यांनी १८ महिन्यातच बहार घेतला.
- फळाचा आकार मोठा, वजन जास्त, आकर्षक रंग, जाड साल यामुळे तीन वर्षापासून जैन टिश्युकल्वर डाळींब रोपांच्या फळांना परदेशात चांगली मागणी.
- गुटी प्रमाणे दोन वर्षे थांबण्याची गरज नाही.
- झाडातील तंतु पेशीपासून रोपांची निर्मिती त्यामुळे १०० टक्के तेल्या व मर मुक्त रोपे फक्त जैन टिश्युकल्वर मुळेच शक्य.
- झाडाच्या खोडापासून तर शेंड्यापर्यंत फळ धारणा.
- तेल्या व मर रोगांच्या प्रसारास आळा घालणारे एकमेव तंत्रज्ञान म्हणजे जैन टिश्युकल्वर डाळींब रोपे.
- भूल थापांना बळी पडू नका - तंत्रज्ञानाची कास धरा.



*अटी लागू

**भगवा किंमत रु. ३० प्रतिरोप, वाहतूक खर्च वेगळा**

जैन ठिबक — पाणी थेंबानं. पीक जोमानं.

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. — कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

जैन टिश्यूकल्चर™ — अधिक उत्पादन - अधिकाधिक नफा.

**बुकींगसाठी संपर्क - जळगांव:** ९४०४९५५३१७, ९४२२७७६७१८, ९४२२७७४९२१, ९४२२७७४९८१, **नंदुरबार:** ९४२२७७४९७५; **पुणे:** ९४२२७७४९३३; **अहमदनगर:** ९४०३६९५९०९ **नाशिक:** ९४०३७७०६२५; **सोलापुर:** ९४२२७७४९३२, ९४२२७७६८२६ **सांगली:** ९४०३०८०१७२, **अमरावती:** ९४०३०८०१३४